# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 18 / 04 / 2023 (मंगळवार) सायंकाळ

---

## शासकीय कामात अडथळा निर्माण करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. उमरेड :— यातील फिर्यादी नामे— शामराव मुरबाजी मेश्राम, रा. एस. टी डेपो उमरेड यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे अप. क्र. ७२/२०२० कलम ३५३, ३३२ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील फिर्यादी हे एस.टी महामंडळ मध्ये चालक या पदावर कार्यरत असुन यातील फिर्यादी हे उमरेड आगार बस क्र. एम. एच.— ४०/८७१६ ने उमरेड हिंगणघाट उमरेड बसमध्ये प्रवासी बसवुन बेसुर फाटयावर प्रवासी **आरोपी नामे— भरत पतीराम धरत, वय ३२ वर्ष, रा. हिवरा हिवरी उमरेड** यांचा बेसुर फाटयावर स्टॉप आल्याने आरोपी यास उतरण्यास सांगितले असता मला हिवरा हिवरीला बसने सोडुन दया असे म्हणुन फिर्यादीला शिवीगाळ केली. फिर्यादीने त्यास बसच्या बाहेर उतरविले असता त्याने फिर्यादीचा कॉलर पकडुन ढकल ढुकल केले व फिर्यादी बसमध्ये बसले असता आरोपीने बसच्या कॅबिनच्या डाव्या बाजूच्या काचाला दगड मारून नुकसान केले.

सदर प्रकरणाचे तपास पोहवा/१३९६ मारूती राऊत पो.स्टे. उमरेड यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टमध्ये सादर केले. आज दिनांक १८/०४/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश डी. जे. कदम सा. नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला दिनांक २९/०१/२०२० ते १२/११/२०२० व दिनांक ०१/१२/२०२२ ते आज दिनांक १८/०४/२०२३ पर्यंत या कालावधीमध्ये जेलमध्ये होता. मा. न्यायालयाने कलम ३२४ भांदवि मध्ये जेलमधील कालावधी हीच त्याची शिक्षा मानण्यात यावी असे आदेश दिले आहेत.

सरकारचे वतीने एपीपी गौरकर सा. यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोना/४८७ माधव काळे पोस्टे उमरेड यांनी मदत केली आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

१) पो.स्टे. सावनेरः — दिनांक १६/०४/२०२३ चे २०/०० वा. चे सुमारास पो.स्टे. सावनेर हद्यीत फिर्यादी यांची १६ वर्षीय फिर्यादीची नातीन ही सावनेर येथील दुकानात काम करते ती रोज सकाळी घरुन ११/०० वा. दुकानात कामाला नेहमी प्रमाणे गेली होती. रात्री ०८/०० वा. घरी परत न आल्याने घरच्या सदस्यांनी आजु बाजुच्या परिसरात तसेच नातेवाईकांकडे शोध घेतला परंतु फिर्यादीची नातीन मिळुन आली नाही. दिनांक १६/०४/२०२३ रोजी रात्री ०८/०० वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात व्यक्तीने तिचे अल्पवयाचा व अज्ञानतेचा फायदा घेवून फुस लावून पळवून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ. यादव १६३९ मो. न ९४२३६०२९८७ करीत आहे.

**२) पो.स्टे. सावनेर : —** दिनांक १६/०४/२०२३ चे १४/३० वा. ते  १७/०० वा. चे सुमारास पो.स्टे. सावनेर हद्दीत फिर्यादी यांची १७ वर्षीय अल्पवयीन मूलगी ही घरी एकटी हजर असता हीला दिनांक १६/०४/२०२३ रोजी दूपारी १४/३० वा. ते १७/०० वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात व्यक्तीने तिचे अल्पवयाच्या व अज्ञानतेचा फायदा घेवून फुस लावून पळवून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ. यादव मो. नं. ९४२३६०२९८७ हे करीत आहे.

## जबर दुखापत

**पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील निसर्ग बार काटोल रोड सावनेर येथे दिनांक १७/०४/२०२३ चे १४.००. वा. दरम्यान फिर्यादी नामे— आशिष शेषराव निळे, वय ३४ वर्ष रा. कॉऑपरेटीव्ह बॅक जवळ खापा प्रभाग क्र. ३ सावनेर हे निसर्ग बार काटोल रोड सावनेर येथे बिअर पिण्याकरीता गेले असता बार मधील काम करणारे वेटरला अर्धी बिअर मागीतली वेटरनी फिर्यादीला फूल बिअर आणुन दिली त्यावरून फिर्यादीने ‘‘मला फूल बिअर का आणुन दिली’’ असे म्हटले असता नमूद **आरोपी नामे— १) देवेन्द्र बंभेरे २) राकेश उर्फ गोलू बबन पन्नामी, वय २९ वर्ष ३) जितेंद्र उर्फ दाउ मुकराम भलावी, वय २५ रा. छपरा जि. सिवनी मध्यप्रदेश ह. मु. सावनेर** यांनी झगडा भांडण करून शिवीगाळ केली व बिअरच्या बाटलाने डोक्यावर व हातभूक्यांनी नाकावर व छातीवर मारहान करून गंभीररित्या जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३२६, ५०६, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. २) व ३) यांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सफौ. सूभाष राठोड पोस्टे सावनेर मो. नं. ९८२३०७४७४२ हे करीत आहे.

## पाण्यात बुडुन मृत्यु

**पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत १३ किमी अंतरावर मौजा गोधनी येथे दिनांक १७/०४/२०२३ चे १४/०० वा. दरम्यान यातील **मृतक नामे— राधोजी गोदरू काळे, वय ७० वर्ष, रा. गोधनी** हे फिर्यादीचे वडिल असुन मृतक यांना दम्याची शिकायत असुन उपचार सुरू होता परंतु त्याच्या प्रकृतीत सुधारणा होत नसल्याने बिमारीला कंटाळुन विहीरीत उडी मारल्याने त्यांचा विहीरीच्या पाण्यात बुडुन मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— बंडु राघोजी काळे, वय ४८ वर्ष, रा. गोधनी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा/भोजराज झाडे पो.स्टे उमरेड मो. क्र. ८९९९४३४२७२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**